**Young Researcher**
**Peer Reviewed | International Open Access Journal**
**ISSN: 2277-7911 | Impact Factor – 7.025| *Website:* https://yra.ijaar.co.in/**
***Volume-15, Issue-1 | January – February – March 2026***

**Original Article**

# एक देश एक निवडणूक सुधारणावादी दृष्टिकोन आणि भविष्यकालीन राजकारण एक अभ्यास

**डॉ. निलेश गोकुळ शेरे**
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख,*
*कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नळदुर्ग,ता. तुळजापूर जिल्हा. धाराशिव.*

**Manuscript ID:**
yrj-150104

**ISSN: 2277-7911**
**Impact Factor – 7.025**

**Volume 15**
**Issue 1**
**Jan-Feb-Mar.- 2026**
**Pp. 21 - 28**

**Submitted:** 7 Jan. 2026
**Revised:** 22 Jan. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 10 Mar. 2026

***Corresponding Author:***
***डॉ. निलेश गोकुळ शेरे***

Quick Response Code:

Web. https://yra.ijaar.co.in/

DOI:
10.5281/zenodo.21054596

DOI Link:
https://doi.org/10.5281/zenodo.21054596

Creative Commons

OPEN ACCESS

***प्रस्तावना :***

*भारतीय लोकशाहीमध्ये निवडणूक ही एक महत्वपूर्ण प्रक्रिया आहे.भारतीय लोकतंत्रात निवडणुक प्रक्रियाचे विविध स्तर आहेत, परंतु मुख्यत: संविधानात संपूर्ण देशासाठी एक लोकसभा आणि वेगवेगळ्या राज्याकरिता वेगवेगळ्या विधानसभाचे प्रावधान आहे. भारतीय संविधानाच्या भाग १५ मध्ये कलम ३२४ ते कलम ३२९ पर्यंत निर्वाचनाची व्याख्या केली आहे. कलम ३२४ निर्वाचनांचे अधिक्षण, निदेशन आणि नियंत्रणाचे निर्वाचन आयोग मध्ये निहित आहे असे सांगितले आहे. संविधानात कलम ३२४ मध्येच निर्वाचन आयोगला निवडणूक संपन्न करण्यासाठीची जबाबदारी दिली आहे. १९८९ पर्यंत निर्वाचन आयोग केवळ एक सदस्यीय संगठन होते परंतु १६ ऑक्टोबर १९८९ ला एक राष्ट्रपती अधिसूचने द्वारे आणखी दोन निर्वाचन आयुक्तांची नियुक्ति करण्यात आली.*

*भारतात सन १९५२ पासून "एक देश एक निवडणूक" या सारखीच प्रक्रिया यापूर्वीही चालूच होती. परंतु सन १९७७ पासून प्रादेशिक राजकीय पक्ष किंवा विधानसभांच्या बरखास्त केल्यामुळे एकाच वेळेस संपूर्ण देशामध्ये लोकसभा, विधानसभा आणि महानगरपालिका ते स्थानिक पातळीपर्यंतच्या सर्व निवडणुका ह्या एकाच वेळेस होत होत्या. परंतु त्यात नंतरच्या काळात खंड पडला. या सुधारणावादी निर्णयाच्या अंमलबजावणी करीता सन २०१४ पासून एक अध्यक्ष समिती नेमून याविषयी सर्वेक्षण आणि अभ्यास करण्यात आला.*

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
***This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0),*** *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

***How to cite this article:***
*डॉ. निलेश गोकुळ शेरे (2026). एक देश एक निवडणूक सुधारणावादी दृष्टिकोन आणि भविष्यकालीन राजकारण एक अभ्यास. Young Researcher, 15(1), 21–28. https://doi.org/ 10.5281/zenodo.21054596*

त्यामध्ये प्रादेशिक पक्ष, राष्ट्रीय पक्ष, स्थानिक पक्ष तसेच विविध अभ्यासक, विधीज्ञ, निवृत्त न्यायाधीश, राज्यशास्त्राचे अभ्यासक, अर्थशास्त्राचे अभ्यासक, इतिहासाचे अभ्यासक तसेच माननीय

पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्या सततच्या प्रयत्नामुळे भाजपा पक्षाच्या अंतर्गत या सुधारणेसाठी भाजप पक्षाने पुढाकार घेतलेला आहे. अत्यंत योग्य निर्णय घेऊन भारतीय निवडणुकीतील होणारे भ्रष्टाचार, विविध प्रशासकीय अधिकारी तसेच निवडणूक अधिकारी कर्मचारी, (इलेक्शन कमिशन) भारतीय निर्वाचन आयोग यांच्यावर आर्थिक तसेच मानसिक अशा विविध प्रकारच्या ताण तणावांला बाहेर काढण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन ऐतिहासिक बदल करण्याचा प्रयत्न केला. देशामध्ये वर्षभर निवडणुका घेण्यामध्ये जो काही राजकीय पक्षांचा वेळ जात होता तो वाचविण्यामध्ये आणि भविष्यकालीन फायद्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन त्यावरती अंमलबजावणी करण्यासाठी भाजपा सरकार प्रयत्नशील आहे.

प्रस्तुत संशोधन लेख एकूणच भारतीय निवडणूक आणि निवडणुकीतील भ्रष्टाचार, अन्याय, त्रुटी तसेच भविष्यकालीन सुधारणा करण्यासाठी तसेच यांचा गुण-दोष यातील निष्कर्ष काढून भविष्यात केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय कार्यामध्ये योगदान देईल. *भविष्यकालीन फायद्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन त्यावरती अंमलबजावणी करण्यासाठी भाजपा सरकार प्रयत्नशील आहे.*

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. भारतीय निवडणूक आणि निवडणूक पद्धतीची चिकित्सा करणे.
2. भारतातील निवडणुकांमध्ये होणाऱ्या अफरातफर तसेच भ्रष्टाचारा संदर्भात काय निर्णय घेण्यात आले याचा सखोल अभ्यास करणे.
3. एक देश एक निवडणूकीमुळे होणाऱ्या बदलाविषयीच्यां तपशिलाचा आढावा घेणे.

**संशोधनाची गृहीतके :**

1. प्रादेशिक पक्ष ‘एक देश एक निवडणूक’ याविषयी संदिग्ध आहेत.
2. भविष्यकालीन निवडणुकीतील भ्रष्टाचार आणि घोटाळे संपुष्टात येईल.
3. ‘एक देश एक निवडणूक’ या धोरणामुळे भारताच्या निवडणूक क्षेत्रात मोठी क्रांती घडून येईल.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक संशोधन पद्धती तसेच ऐतिहासिक विश्लेषण पद्धती या संशोधन पद्धतींचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक तसेच दुय्यम साधनांच्या द्वारे संशोधन करण्यात आले आहे. संकेतस्थळे, मासिके, वृत्तपत्रे, इलेक्शन कमिशनचे रिपोर्ट तसेच विविध प्रसिद्ध तसेच अप्रकाशित साहित्याचा या संशोधन लेखासाठी वापर करण्यात आलेला आहे.

**भारतीय निवडणुक आयोगाचा इतिहास :**

भारतीय संविधानाच्या कलम नुसार भारतामध्ये सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येतात आणि त्याद्वारे भारतीय नागरिक आपल्या देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री, तसेच विविध खात्याचे मंत्री आमदार, खासदार, तसेच महापौर, नगराध्यक्ष, सरपंच यासारख्या विविध पदाधिकारी यांना निवडणुकीच्या माध्यमातून निवडून देण्यात येते. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष निवडणुकीच्या माध्यमातून भारतीय जनता आपला नेता किंवा प्रतिनिधी नियुक्त करत असते आणि त्यांना पदच्युतही करू शकते यामध्ये भारतीय जनता ही सर्वोच्च आहे. त्यामुळे भारताची लोकशाही आजपर्यंत टिकून आहे.

**भारत जगातील सर्वात मोठा लोकशाही असणारा देश म्हणून ओळखला जातो.**

भारतातील सर्वप्रथम १९५२ ला सार्वत्रिक निवडणुका झाल्या आणि राष्ट्रीय काँग्रेस आणि त्यांचे मंत्रिमंडळाने अखंड रित्या राजकारणामध्ये राहून भारतीय राजकारणाचे आतापर्यंत राजकारण चालविले. भारतीय राज्यघटनेनुसार मध्ये आवश्यकतेनुसार घटनात्मक बदल करून वेगवेगळ्या सुधारणा वेळोवेळी करून घेतल्या त्यानुसारच भारतीय राज्यघटना लवचिक स्वरूपामध्ये असल्यामुळे त्यामध्ये काळा अनुरूप बदल करण्याचे स्वातंत्र्य हे त्या त्या मंत्रिमंडळाला देण्यात आलेले आहे. त्यासाठी घटनात्मक तरतूदही करण्यात आलेली आहे. या घटनात्मक तरतुदीनुसार भारतीय घटनेच्या कोणत्याही कलमांमध्ये सार्वत्रिक मतानुसार आणि विविध संशोधन करून त्यामध्ये दुरुस्त्या करता येतात. त्या करण्यातही आलेल्या आहेत.

प्रत्येक बहुमतातील राजकीय पक्ष आपल्या हिताचे कायदे अंमलात आणण्यासाठी प्रयत्नशील राहतात. त्यातच आपल्या कालखंडामध्ये काँग्रेसने विविध प्रकारचे कायदे घडवून आणून आपल्या पक्षाचे हितसंबंध साधलेले आहेत. त्यासोबतच भारताचेही संबंध त्यामधून साधले गेलेले आहेत. हा इतिहास जरी असला तरी आज सत्तेमध्ये असणारे सरकार 'भाजप सरकार' या मताला दुमत असू शकत नाही. त्यांनाही आपल्या योजना अंमलात आणण्यासाठी वेगवेगळे सुधारणाचा योग साधण्याचा प्रयत्न करत आहे.

'एक देश एक निवडणूक' या प्रयत्नाचा हा एक अविभाज्य भाग असून भारतातील भविष्यकालीन निवडणुका अतिशय पारदर्शक आणि भ्रष्टाचार मुक्त व्हाव्यात अशी अपेक्षा आहे. तसेच भारताच्या अर्थव्यवस्थेचा विचार केल्यास आत्तापर्यंतच्या निवडणुकांच्या आर्थिक खर्चाच्या आढावा घेतल्यास आपल्याला असे दिसून येते की, अनावश्यक खर्च हा निवडणुकीच्या माध्यमातून होताना त्यांना दिसून येत आहे. तो रोखणे तसेच आपल्या हितसंबंधाला कोणत्याही विरोधाशिवाय प्रत्यक्षात आणता यावे. याचाही थोड्याफार प्रमाणात होईना तेही ते हित डोळ्यासमोर ठेवूनच भाजपा सरकार अशा प्रकारचे सुधारणावादी निर्णय घेण्याचे कार्य करीत असल्याचे दिसून येत आहे.

Young Researcher
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2277-7911 | Impact Factor – 7.025| Website: https://yra.ijaar.co.in/
Volume-15, Issue-1 | January – February – March 2026

**‘एक देश एक निवडणूक’ योग्य की अयोग्य :**

भारत देशामध्ये एक वेळी संपूर्ण भारतामध्ये निवडणूक प्रक्रिया राबविण्यामध्ये आणि प्रशासनामध्ये असणारा संभ्रम करणारी, विविध प्रश्न, समस्या, अडचणी यांच्या अभ्यास करून एक नवीन सुधारणावादी विचार पुढे मांडण्यात आलेला आहे. आतापर्यंत झालेल्या निवडणुका पाहिल्यास सन १९५२ ते १९७७ या कालखंडामध्ये लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या निवडणुका एकाच वेळी होत होत्या. परंतु काही राज्यसरकारांच्या विधानसभांच्या बरखास्तेमुळे या परंपरेला तडा गेला.

‘एक देश एक निवडणूक’ घेण्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या समस्या नाहीत, असे २०२४ च्या अहवालामध्ये निष्कर्ष काढण्यात आलेला, तो संपूर्ण अहवाल राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्याकडे १८,००० पानांचा अहवाल सादर करण्यात आलेला आहे. त्यासाठी भारताचे कनिष्ठ सभागृह असलेले लोकसभा तसेच भारताचे संसदेचे वरिष्ठ सभागृह राज्यसभा यांच्यामध्येही वेळोवेळी ठराव घेऊन या प्रकारचे निर्णय घेण्यास हरकतीत मागविण्यात आल्या. चर्चाही करण्यात आल्या. त्यावर प्रश्न-प्रति-प्रश्न आणि संशोधनात्मक माहिती मिळविण्यात आली.

आत्तापर्यंतच्या निवडणुकांमधील झालेल्या आर्थिक उल्लाढालींचा आढावा खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेला आहे.

**निवडणुकीत होणाऱ्या खर्चाचा आकडेवारीचा तपशील:**

| अ. क्र. | वर्ष | एकूण खर्च (करोड मध्ये ) |
|---|---|---|
| १. | १९५२ | १०.४५ |
| २. | १९५७ | ५.९ |
| ३. | १९६२ | ७.३२ |
| ४. | १९६७ | १०.७९ |
| ५. | १९७१ | ११.६ |
| ६. | १९७७ | २३.०३ |
| ७. | १९८० | ५४.७७ |
| ८. | १९८९ | ५४.३२ |
| ९. | १९९१ | ३५९.१ |
| १०. | १९९६ | ५९७.३४ |
| ११. | १९९८ | ६६६.२२ |
| १२. | १९९९ | ९४६.६८ |
| १३. | २००४ | १०१६.०८ |
| १४. | २००९ | १११४.३८ |
| १५. | २०१४ | ३८७०.३४ |
| १६. | २०१९ | ६५०० |
| १७. | २०२४ | १०००२.३२ (अंदाजित.) |

स्त्रोत: : https://papers.ssrn.com/sol3/papers.cfm?abstract_id=5007991

भारताच्या शेजारी देशांमध्ये जसे की, पाकिस्तान राष्ट्रीय संसदेसह राज्य विधिमंडळासाठी

एकाच वेळी निवडणुका घेतल्या जातात तसेच नेपाळमध्ये ही सन २०१५ मध्ये नवीन संविधान स्वीकारल्यापासून सरकारच्या सर्व प्रकारच्या त्रिस्तरीय स्थानिक कार्यकारी मंडळाच्या अशा प्रकारच्या निवडणुका ह्या एकाच वेळी घेण्यात येतात. तर अन्य देशांमध्ये स्वीडन सरकारच्या सार्वजनिक निवडणुका ह्या त्रिस्तरीय असल्या तरी एकाच वेळी घेतल्या जातात. त्यासोबतच बेल्जियम, युरोपियन युनियन आदि देशांच्याही निवडणुकाही या संसदीय आणि प्रांतिक निवडणुका एकाच वेळी घेतल्या जातात. यावरून भारतासाठीही अशा प्रकारच्या निवडणुका घेतल्यास त्याचा फायदा हा देशाच्या अर्थव्यवस्थेला आणि राष्ट्रीय तसेच प्रादेशिक पक्ष जे चांगले कार्य करतात अशा सर्वच पक्षांना होणार हे निश्चितपणे सांगता येते.

भारतीय कायदा आयोगाने ऑगस्ट २०१८ मध्ये देशातील पंचायतीराज पासून ते लोकसभेपर्यंतच्या सर्व निवडणुका एकाच वर्षाच्या दिलेल्या कालावधीमध्ये एकाच वेळी घेण्याबाबतचा मसुदा अहवाल प्रसिद्ध केला होता. अशावेळी एकाचवेळी त्रिस्तरीय निवडणुका घेण्यासंदर्भात संविधान लोकप्रतिनिधी कायदा १९५१ आणि लोकसभा आणि विधानसभांच्या कार्यपद्धती व त्यांच्या नियमांमध्ये योग्य त्या सुधारणा करणे आवश्यक आहे असे या मसुद्यामध्ये म्हटलेले आहे.

निवडणूक आयोगाने ही अशी शिफारस केलेली आहे की, ज्या सुधारणांना किमान 50% राजांकडून मान्यता मिळायला हवी एकावेळी निवडणुका घेण्याच्या फायद्याबद्दल आयोगाचे असे म्हणणे आहे की, यामुळे सार्वजनिक वेळेची तसेच पैशाची आणि प्रशासकीय व्यवस्थेवरील ताणतणावाची तसेच सुरक्षा दलांचेही आणि सरकारी धोरणांच्या जे काही अंमलबजावणीची आणि निवडणूक प्रचाराची अशी विविध प्रशासकीय कामे जी अतिशय महत्त्वपूर्ण आणि विकासासाठी महत्त्वपूर्ण असणाऱ्या गोष्टीवर वेळ देण्यासाठी सोपे जाईल. म्हणून या 'एक देश एक निवडणूक' धोरण अंमलबजावणी करणे उचित ठरेल.

भारतीय संविधानाच्या कलम ३५६ च्या वापरामुळे अर्थातच मुंबई विरुद्ध भारतीय संघराज्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर लक्षणीरित्या कमी झाली आहे किंवा इतर कारणांमुळे उद्धभवू शकणाऱ्या सर्व परिस्थिती आणि घटना यांची आपण कल्पना करू शकत नाही किंवा त्याची तरतूदही करू शकत नाही. तरीही विधानसभेसाठी स्वतंत्र निवडणूक घेणे हा अपवाद असावा किंवा त्यासाठी काही नियम करावेत. लोकसभा आणि सर्व विधानसभेसाठी दर पाच वर्षांनी एकदा निवडणूक घ्यायला पाहिजेत. ज्या अर्थी क्रमिक सार्वजनिक तक्रारी कायदा आणि न्याय या विभागाचे संबंधित स्थायी समितीने डिसेंबर २०१५ मध्ये सादर केलेल्या लोकसभा आणि राज्यसभा विधानसभांच्या एकाच वेळीच्या निवडणुका घेण्याची व्यवहार्यता यावरील ७९ व्या अहवालावर देखील या प्रकरणाची तपासणी केली आहे. आणि दोन टप्प्यात एकाच वेळी निवडणुका घेण्याची पर्यायी आणि व्यवहारी पद्धतीची शिफारसही करण्यात आलेली आहे. म्हणून आता वरील बाबी लक्षात घेता आणि राष्ट्रीय हितासाठी देशात

एकाच वेळी सार्वजनिक निवडणुका घेणे कितपत योग्य आहे. म्हणून भारत सरकार एकाच वेळी निवडणुका घेण्याच्या मुद्द्यांची तपासणी करण्यासाठी आणि एकाच वेळी निवडणुका घेण्यासाठी शिफारशी करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती (एच. एल. सी.) म्हणून स्थापन केलेली आहे. हे समिती भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाली. समितीचे इतर सदस्य अमित शहा केंद्रीय गृहमंत्री. अर्जुन राम मेघवाल. केंद्रीय कायदामंत्री विधानसभेतील सर्वात मोठा विरोधी पक्ष असलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे संसदीय नेते आधिर रंजन चौधरी तसेच गुलाम नवी आझाद, राज्यसभेतील माजी विरोधी पक्ष नेते तसेच पंधराव्या वित्त आयोगाचे सदस्य अध्यक्ष हा लोकसभेचे माजी महासचिव डॉ. सुभाष महाडिक, सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ वकील हरिश साळवे, संजय कोठारी, तसेच माजी मुख्यतः दक्षता आयुक्त इत्यादी सदस्य या समितीमध्ये आहेत. १४ मार्च २०२४ रोजी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी समितीने तयार केलेला १८,००० पानांचा अंतिम अहवाल आपल्या राष्ट्रपतींकडे सुपूर्द केला आहे.

अशाप्रकारे वरील विविध चर्चा तर्क वितर्क तसेच संबंधित प्रश्न यांची सर्व समावेशक चर्चा करून अभ्यासांती काही निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत ते खालीलप्रमाणे आहेत.

१. प्रत्येक राजकीय पक्ष आपापल्या भविष्यासाठी प्रयत्न करत असतो. त्यामध्ये राज्यघटनेत यथायोग्य बदल किंवा सुधारणा घडवून आणतात आणि आपले राजकीय हितसंबंध साधतात. यासाठी राजकीय खेळी सुद्धा करण्यात येते आणि त्यामधूनच वेगवेगळ्या सुधारणा करण्यात सर्वांचेच मत वळविण्यात येते.
२. भविष्यकालीन भारताच्या निवडणुकीमधील खूप मोठा बदल असल्यामुळे त्याचा प्रत्यक्ष फायदा सत्तेमध्ये असणाऱ्या पक्षांना जास्त प्रमाणात होईल.
३. 'एक देश एक निवडणूक' याच्या माध्यमातून राष्ट्रीय कार्य किंवा देशाच्या निर्वाचन आयोगाच्या सुधारनेतील सर्वोच्च महत्त्वपूर्ण सुधारणा असेल त्यामुळे याचा आर्थिक फायदा देशाला निश्चितपणे होईल.
४. सन २०१४ पासून गुजरात राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री असलेले नरेंद्र मोदी आणि सध्याचे प्रधानमंत्री यांनी 'एक देश एक निवडणूक' एकाच वेळी निवडणुका घेण्याचे समर्थन करत आहेत आणि त्यामुळे सार्वजनिक पैशाचा अपव्य कमी होईल आणि विकास कामांना सुरळीत सुरक्षित प्रवाह मिळेल. "आदर्श आचारसंहिता" लागू झाल्यावरही या पक्षांना रोखण्यात येते त्यावरील अन्यायकारी धोरण संपुष्टात येऊन देशाचाच फायदाच होईल.
५. निवडणुकांमध्ये भ्रष्टाचाराच्या माध्यमातून आणि मतदारांना विविध प्रलोभने देऊन किंवा खोटी आश्वासने देऊन प्रलोभित करता येणार नाही

आणि निवडणुकीमध्ये विकासात्मक धोरणावर राजकीय पक्ष लक्ष देतील.

६. विविध तज्ञांच्या मते वारंवार होणाऱ्या निवडणुका 'एक देश एक निवडणूक' यामुळे दीर्घकालीन धोरणात्मक निर्णयासाठी अडथळा आणतात कारण प्रत्येक निर्णयाला मतदारांसाठी अमिष दिले जाते आणि त्यामुळे धोरणात्मक निर्णय घेण्यामध्ये अडचणी निर्माण होतात.

७. भारतात वारंवार होणाऱ्या निवडणुका म्हणजे भारतात उत्सव साजरे करण्यासारखे वातावरण आपल्याकडे निर्माण होते ते संपुष्टात येऊन 'एक देश एक निवडणूक' यामुळे भारतीय निवडणूक आयोगाची डोकेदुखी कमी होणार आहे.

**सारांश :**

थोडक्यात, सांगावयाचे असेल तर अशाप्रकारे वर उल्लेखित केलेल्या विविध प्रक्रिया आणि कार्यपद्धती यामुळे भारतीय निर्वाचन आयोग आपले कार्यप्रवण, सुसूत्रता आणू शकेल आणि निवडणूक आयोगाचा सर्वाधिक आर्थिक तसेच वेळेचा अपव्य होण्यापासून निश्चितच लाभ मिळेल. भारतीय लोकशाहीला एक देश एक निवडणूक या धोरणामुळे प्रगल्भता येऊन लोकशाही गणराज्याची व्यवस्था आणि राज्य सरकार, केंद्र सरकार, स्थानिक सरकार तसेच नगरपालिका, महानगरपालिका यांचे केंद्रीकरण होऊन त्यांना आपल्या विकासात्मक योजना देशात राबविण्यात एकात्म विकास करण्याचीहि संधी मिळेल.

या सर्व गुणांमुळे आपण त्यांच्या दोषाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यासाठी उपाययोजनात्मक काही कायदे करावे लागतील. ज्यामुळे राज्य सत्तेमध्ये असणाऱ्या पक्षावरही काही निर्बंध असावे नाहीतर त्यामुळे सुद्धा देशात संशयात्मक आणि अविश्वासाचे वातावरण तयार होऊन या सुसंधीचे दुर्दैवात्मक फलित भारतीय लोकशाहीला भोगावे लागू शकते.

**संदर्भ ग्रंथसूची:**

1. Santosh Kumar, A New National Election Reforms "One India One Election and also People with Three Votes, Voice of Intellectual Man-An International Journal; 2020.
2. https://en.wikipedia.org/wiki/One_Nation,_One_Election
3. https://www.indiatoday.in/india/story/what-does-one-nation-one-election-mean-pros-and-cons-of-simultaneous-polls-2429335-2023-08-31
4. https://www.tutorialspoint.com/indian_polity/indian_polity_elections_system.htm
5. https://www.newindianexpress.com/nation/2019/Jun/04/2019-lok-sabha-elections-most-expensive-ever-bjp-top-spender-report-1985636.html

6. https://eci.gov.in/about/about-eci/the-functions-electoral-system-of-india-r2/
7. https://nios.ac.in/media/documents/srsec317new E/317EL18.pdf
8. https://www.livemint.com/news/india/ready-for-one-nation-one-election-says-election-commissioner-chief-11646889681226.html
9. https://www.legalserviceindia.com/legal/article-1763-one-nation-one-election-constitutional-challenges.html
10. लोकराज्य मासिक २०२४.
11. लोकप्रभा, २०२२
12. इकॉनॉमिक पोलिटिकल विकली मधील लेख.